
MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता

Special Issue, Vol-01, Jan To March 2024
Peer Reviewed International Multilingual Research Journal




Chief Editor
Dr. Bapu G Gholap

Editor
Dr.M.A. Shahezad
Dr.Y.S.Mahure
Dr.M.H.Dhale

14) A REVIEW ON SUPERCAPACITORS: TYPES AND APPLICATIONS
**Miss. Himani M. Gaidhane, Badnera** ||62

15) Study of Phytoplankton in Waghadi river streaming from Devdhari Village
**Ninad Dharkar, Dist.Yavatmal.(M.S)** ||68

16) IMPACT OF GST ON INDIAN ECONOMY
**Mr. Milind H.Dhale, Ghatanji** ||70

17) कृषी क्षेत्रामध्ये शाश्वत विकासाचे महत्व
**प्रा. डॉ. राधेश्याम पी. चौधरी, जि. यवतमाळ** ||74

18) Education for Sustainable Development डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या राजकीय ...
**प्रा. वाल्मीक पुंजारामजी डवले, अमरावती** ||77

19) महात्मा बसवेश्वरांची क्रांती आणि त्याचा भारतीय समाजावरील प्रभाव : एक ...
**सुवर्णा शिवानंद सावळकर (मानेकर), डॉ.युवराज शामरावजी माहुरे** ||81

20) आहारशास्त्रामुळे गोंड आदिवासी किशोरवयीन मुलींचा खाद्यसंस्कृती बाबत ...
**प्रा. मोनाली सलामे, यवतमाळ** ||84

21) भारतीय ज्ञानकेंद्र व त्याचे परिणाम—एक अध्ययन
**प्रा.डॉ.जगदीश दयासागर हेंडवे, जि.यवतमाळ** ||89

22) महिला शिक्षण आणि आर्थिक जीवन
**प्रा. सुलोचना उध्दव जाधव, जि. नांदेड** ||91

23) प्रेमानंद गज्वी यांच्या ' हवे पंख नवे ' मधील बोधी विचार
**डॉ.शांतरक्षित गावंडे, नेर** ||95

24) भारतीय ज्ञानप्रणालीत ग्रंथालय आणि माहिती तंत्रज्ञानाची भूमिका
**डॉ. एकता मेनकुदळे, जिल्हा यवतमाळ** ||97

25) नवीन शैक्षणिक धोरण २०२० आणि आदिवासी समाज विशेष संदर्भ किनवट तालुका
**डॉ.स्वाती विकासराव कुरमे, किनवट** ||101

26) पर्यावरणीय शाश्वत विकास व वास्तविकता
**डॉ. संजय उध्दवराव देशमुख, जि. अमरावती** ||103

26

# पर्यावरणीय शाश्वत विकास व वास्तविकता

डॉ. संजय उध्दवराव देशमुख
सहाय्यक प्राध्यापक(वाणिज्य विभाग)
श्रीमती राधाबाई सारडा कला—वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अंजनगाव सुर्जी, ता. अंजनगाव सुर्जी, जि. अमरावती

**********

**गोषवारा:**

६५ कोटी वर्षापूर्वी पृथ्वीवर सजिवसृष्टी अस्तित्वात आलेली आहे. त्यामध्ये मनुष्य हा एकमेव बुध्दीजीवी प्राणी म्हणून जन्मास आला. त्या बुध्दीच्या भरवश्यावर त्याला सजिवसृष्टी मध्ये राजाचे स्थान मिळाले आणि तो जगाचा राज्यकर्ता बनला. परंतु आपण निसर्गाचा एक अविभाज्य घटक असल्याचे तो विसरला आणि आपल्या अमर्याद गरजा भागविण्यासाठी मानवाने नैसर्गिक घटनांचा अविवेकी वापर सुरु केला. त्यामधून वायु प्रदुषण, जल प्रदुषण, भूप्रदुषण, ध्वनी प्रदुषण इ. राक्षसांचा जन्म झाला. व त्यांच्या पासून पृथ्वीवरील मानवा सोबतच इतर सजिवांना व भौतिक घटकांना अपाय व्हायला लागला. अश्याप्रकारे प्रदुषण होत राहील्यास पृथ्वीवरील सजिवांचे अस्तित्व नजीकच्या काळात नष्ट होइल हे जेव्हा पर्यावरण तज्ञांच्या लक्षात आले तेव्हा १९८७ मध्ये युनो द्वारा जागतिक पातळीवर जागतीक पर्यावरण आणि विकास आयोग स्थापन करण्यात आला. या आयोगाने “Our Common Future” हा अहवाल सादर केला. त्यामध्ये शाश्वत विकास ही संकल्पना मांडली गेली. त्यामध्ये भावी काळातील पिढ्यंची गरजांशी तडजोड न करता वर्तमान पिढ्यंच्या गरजा पूर्ण करणे म्हणजे शाश्वत विकास होय अषी शाश्वत विकासाची व्याख्या करण्यात आली. यामध्ये पर्यावरण संवर्धन करुन विकास करण्याला महत्व देण्यात आले आहे. परंतु आजची वास्तविक स्थिती पाहता व नैसर्गिक घटकांची मानवा कडून होत असलेली लुट लक्षात घेतल्यास शाश्वत विकास ही संकल्पना फक्त कागदावर दिसून येते. जगामधील राज्यकर्ते व नागरीक हे पर्यावर रक्षणाबाबत उदासीन असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मानव वर्तमान काळातच आपले अस्तीत्व स्वत:हून धोक्यात घालत असल्याचे दिसते.

**प्रस्तावना:**

पृथ्वीवर सजीवसृष्टी ६५ कोटी वर्षापूर्वी पासून विकसीत झाल्याचे तंज्ञाचे मत आहे. ६५ कोटी वर्षापासून आजपर्यंत निसर्गाचे कुशीत जैवविविधता वाढलेली दिसून येते. निसर्गाचे छत्रछाये खाली विविध सजिवांच्या जन्माबरोबर मानव नावाचा जीव सुध्दा निर्माण झाला, इतर प्राण्यांपेक्षा मानवाला निसर्गाकडून मिळालेली देणगी म्हणजे मानवाची बुध्दीमत्ता होय. या बुध्दीमत्तेच्या भरवष्यावर मनुष्य संपूर्ण सजिवसृष्टी मध्ये एखाद्या राजाप्रमाणे राज्य करायला लागला. त्याने आपल्या बुध्दीच्या जोरावर विविध शोध लावले.त्या षोधाचा उपयोग मानवाने आपले जीवन अधिकाधिक सुखी व आरामदायी बनविण्यासाठी केला. यावेळी इतर सजिवसृष्टीवर हवा, पाणी, जमीन इ. नैसर्गिक घटकांवर त्याचा काय प्रतिकुल परिणाम होतो हे मात्र मानव विसरला. आपल्या अविवेकी कृतीमुळे मानवाने विकासाचे नावाखाली विविध नैसर्गिक घटकांची उधळपट्टी केली व करीत आहे. त्याचे वाईट परिणाम आज मनुश्य व इतर जीव भोगत आहेत. मनुश्य एवढ्यवरच थांबला नाही तर त्याने वैयक्तिकरित्या व समुहाने इतरांवर वर्चस्व प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. यामधुनच मानवाच्या भुतकाळापासून वर्तमान काळापर्यंत मानव युध्द करीत असल्याचे दिसुन येते. इतिहासापेक्षा अलीकडील काळात मानवाने युध्दामध्ये निसर्गाची मोठ्य प्रमाणात हानी केल्याचे दिसून येते. एकट्य मनुष्य जातीने निसर्गाचे एवढे मोठे नुकसान केले आहे की ते कधीही भरुन निघणार नाही असे पर्यावरण क्षेत्रातील अभ्यासकांचे मत आहे. अविवेकी मनुश्य वैयक्तिक स्वार्थापोटी व दुरदृष्टीच्या अभावी आपल्या वारसाकरीता सोने, चांदी, जडजवाहीर, भुखंड गोळा करण्यासाठी अहोरात्र प्रयत्न करीत आहे. या

MAH MUL/03051/2012
ISSN: 2319 9318

Vidyawarta®
Peer-Reviewed International Journal

Jan. To March 2024
Special Issue - I



कृती मधुन पृथ्वीवरील मर्यादित व मौल्यवान नैसर्गिक घटकांचा आपण नाश करीत आहो हे मात्र तो विसरला आहे. आपण ज्यांच्यासाठी मौल्यवान वस्तुचा संग्रह करीत आहो त्यांना भविष्यात यापेक्षा शुध्द हवा, पाणी, सुपीक जमीन, दुर्मीळ सजीव संपत्ती इ. जीवनावश्यक घटकांची आवश्यकता असेल हे मात्र मनुश्य विसरला आहे. जगाच्या पाठीवर मनुष्य हा कर्ता असुन त्यावर कोणाचेही नियंत्रण नाही. जगामध्ये विविध देशाचे नेतृत्व पाहणारे राज्यकर्ते हे सुध्दा पर्यावरण वाचविण्याकरीता कागदोपत्री प्रयत्न करतांना दिसून येत आहेत. जागतिक पर्यावरण वाचविण्यासाठी युध्दपातळीवर प्रयत्न करण्याची गरज असतांना त्यादृष्टीने भरीव असे प्रयत्न होताना दिसत नाही. जागतिक पातळीवर पर्यावरण वाचविण्यासाठी होणाऱ्या सभांमध्ये विविध मुद्यांवर चर्चा होतांना दिसून येते. त्यामधुन विकसनशील व विकसीत देष एकमेकांवर आरोप करतांना दिसतात. परंतु ठोस असे काही निष्पन्न होतांना दिसत नाही. सभेमध्ये विविध मुद्यांवर मतभेद होते परंतु अंमलबजावणी मध्ये मात्र दिरंगाई झालेली दिसते.

**उद्दिष्टे:** पर्यावरणीय चिरंतन विकासाबाबत मानवाची भूमिका जाणून घेणे.

**गृहितके:** लोकांमध्ये काही अपवाद वगळता पर्यावरणीय जागरुकता नाही.

**संशोधन पध्दती :** सदर अध्ययनाकरीता द्वितीयक तथ्य संकलन पध्दतीचा आधार घेतला आहे. पुस्तके व इंटरनेट वरुन मिळालेल्या माहीतीचा उपयोग संशोधनाकरीता करण्यात आला आहे.

**परिणाम व चर्चा :**

Sustainable Development हा शब्द प्रथम IUCN या संघटनेने आपल्या रिपोर्टमध्ये उपयोगात आणला. १९८७ मध्ये युनो द्वारा जागतिक पातळीवर जागतिक पर्यावरण आणि विकास आयोग स्थापन करण्यात आला. या आयोगाच्या अध्यक्षा नार्वेच्या पंतप्रधान ग्रो हारलेम ब्रुन्डलॅण्ड ह्य होत्या. या आयोगाने "Our Common Future" हा अहवाल सादर केला. त्या अहवालामध्ये शाश्वत विकास ही संकल्पना मांडली गेली. ब्रुंडलॅण्ड अहवालामध्ये शाश्वत विकासाची व्याख्या भावी काळातील पिढ्यांची गरजांशी तडजोड न करता वर्तमान पिढीच्या गरजा पुर्ण करणे म्हणजे षाष्वत विकास होय. शाश्वत विकासाच्या संकल्पने मध्ये पर्यावरणाला हानी न पोहचवता विकास घडवून आणण्याला महत्व देण्यात आले होते. शाश्वत विकास या संकल्पने मधुन मानव जातीला अनमोल असा संदेष देण्यात आला आहे. वर्तमान काळात मानवाने विकास साधत असताना भावी पिढीतील व इतर सजिवसृष्टी साठी नैसर्गिक घटकांचे जतन करण्याबाबतचा संदेष आहे. नैसर्गिक घटक जसे हवा, पाणी, जमीन, खनीजे इ. नैसर्गिक साधनसंपत्ती वापर प्रत्येक सजिवाचा हक्क आहे. एवढेच नव्हे तर या भूतलावर मानवी अस्तित्व टीकून राहण्यासाठी जैवविविधता असणे आवष्यक आहे. या संकल्पनेतून चिरंतन विकास ही संकल्पना अस्तित्वात आलेली आहे. मानवी इतिहासामध्ये मानव [illegible] अनेक शोध लागले. त्या संषोधनाचा उपयोग आर्थिक विकासाचे प्रक्रियेत करण्यात आला. आणि वेगवेगळ्या प्रदुषणाचा जन्म झाला. उदा. भूगर्भातील खनीज शुध्द करुन डिझेल, पेट्रोल, केरोसीन तयार करण्यात येवून वापरण्यात आले. भुगर्भातील कोळसा, वृक्षतोड करुन लाकुड जाळल्यामुळे वायु प्रदुशण मोठ्य प्रमाणात झाले. त्यामुळे जागतिक तापमान वाढीचे संकट उभे झाले. उत्पादनाचे प्रक्रियेत पाणी मोठ्य प्रमाणात वापरल्या गेले. कारखान्यातून बाहेर निघणारे दुशीत पाणी सरळपणे नदी, नाले, याद्वारे समुद्रात मीळत आहे. त्यामुळे जलस्त्रोत दुशीत झालेले असुन नदी, नाले आणि समुद्र यामधील जैवविविधतेला बाधा पोहचत आहे. वाढत्या लोकसंख्याची अन्नधान्य व इतर गरजापुर्ण करण्यासाठी षेती मध्ये किटकनाषके व रासायनिक खतांचा मोठ्य प्रमाणात वापर होत आहे त्यामुळे भूप्रदुशण होवून जैवविविधतेला बाधा पोहचत आहे. ओझोन थराचा नाष होत असल्यामुळे सुर्याचे किरणे थेट पृथ्वीवर येवून सजिवांना धोका होण्याची शक्यता पर्यावरण तज्ञांनी वर्तवलेली आहे. ध्वनी प्रदुषण, किरणोत्सार, कचरा प्रदुशण याचा दुष्परिणाम संपूर्ण सजिव सृष्टीवर पडत आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे बेरोजगारीच्या समस्ये सोबत वरील सर्व प्रकारचे प्रदुषण वाढत आहे. या वाढत्या प्रदुषणामुळे पृथ्वीवरील ऋतुचक्रामध्ये

अनियमीतता आलेली आहे. त्यावर मात करण्याचा प्रयत्न मनुश्य करीत आहे. जसे कृत्रीम पाउस पाडणे इ. परंतु त्यामध्ये त्याला यष प्राप्त होतांना दिसत नाही. पृथ्वीवरील पर्यावरणाची हानी अषाच प्रकारे सुरू राहील्यास येथील जीवन हे २०० ते ३०० वर्शात संपुश्टात येइल असे पर्यावरण तज्ञांचे मत आहे. म्हणूनच स्टीफन हॉकीन्स यांनी मानवी अस्तित्वासाठी नविनग्रह षोधण्याचा सल्ला दिला. आजच्या मानसाची अवस्था ही षेतातल्या माकडाप्रमाणे झालेली दिसते. माकड षेतामध्ये पीक खाण्याऐवजी पीक जास्त तुडवतो व नुकसान करतो. त्याचप्रमाणे मनुश्य सुध्दा नैसर्गिक घटकांच्या बाबत नासाडी करतांना दिसत आहे. याचे छोटे व उत्तम उदाहरण म्हणजे लग्नप्रसंगी ताटामध्ये वाया जाणारे अन्न, पाणी, युज ॲन्ड थ्रो, प्रवृत्ती हे मनुश्य पर्यावरणदृश्टया निरक्षर असल्याचे लक्षण आहे. यासर्वांकरीता कारणीभूत हे राज्यकर्ते आहेत. याबाबत दुमत असावयास नको, कारण षासनकर्ते हे विविध कायदे तयार करुन त्यांची अंमलबजावणी करुन घेवू षकतात परंतु त्यांचे ठिकाणी दुरदृश्टीचा अभाव, सर्वसामान्यांच्या कल्याणाबाबत असलेली अनास्था दिसुन येते. भारतासारख्या लोकशाही देशामध्ये राज्यकर्ते सत्ता टिकवून ठेवण्यासाठी जनकल्याणार्थ कायदे करुन अंमलबजावणी करतांना दिसून येत नाहीत. त्यांचे उत्तम उदाहरण म्हणजे भारतामध्ये झालेली लोकसंख्येची वाढ ही पर्यावरण नाश होण्यासाठी कारणीभूत ठरली आहे. परंतु लोकसंख्या वाढी साठी शासन स्तरावर कोणतेही ठोस पाउल उचललेले दिसत नाही. शालेय अभ्यासक्रमामध्ये पर्यावरण व प्रदुशणाचे दुष्परिणाम याला काही अपवाद वगळता प्राधान्य दिलेले दिसत नाही. शाळा, महाविद्यालया मध्ये पर्यावरण हा विषय आवष्यक विशयामध्ये नसुन पर्यायी विषय म्हणून दिसून येतो. सुषीक्षीत भारतीय लोक सुध्दा पर्यावरण रक्षणाबाबत उदासीन असलेले दिसून येतात. त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे भारतीय लोकांकडून सार्वजनिक कार्यक्रमामधून होणारे ध्वनी प्रदुशण, अन्नाची नासाडी, कचरा प्रदुशण, दैनंदिन जीवनामध्ये विजेचा अपव्यय हा वायु प्रदुशणाकरीता कारणीभूत ठरतो. कारण भारतामध्ये अजुनही औष्णीक विज प्रकल्पामध्ये कोळसा जाळून विज निर्मिती होत आहे. बेसुमार होत असलेली वृक्षतोड, वृक्षारोपण व संवर्धनाचा अभाव, सौर उर्जा वापरा मधील उदासीनता ह्य सर्व बाबी नागरीकांची पर्यावरण रक्षणाबाबतची उदासीनता दर्शवितात. याकरीता या भूतलावरील प्रत्येक मनुष्याने जगा—जगु द्या—जगवा आणि जागवा या मुल्यांचा अंगीकार करणे आवश्यक आहे.

**निष्कर्ष :**

वाढत्या प्रदुशणाचे चटके जेव्हा सजिवसृष्टी सोबतच मनुष्याला बसायला लागले तेव्हा जगातील पर्यावरण क्षेत्रातील तज्ञांनी त्याची जाणीव जगाला करुन दिली. त्यातुनच शाश्वत विकास ही संकल्पना जन्माला आली. वाढती लोकसंख्या, आर्थिक विकासामध्ये उपयोगात आणलेली संषोधने व नविन तंत्रज्ञान यामुळे जन्माला आलेली वायु प्रदुशण, जल प्रदुशण, भू प्रदुशण, ध्वनी प्रदुशण, किरणोत्सार, कचरा प्रदुशण इ. मुळे पृथ्वीवरील सजिवसृष्टीच्या अस्तित्वाला धोका निर्माण झाला. पर्यावरण क्षेत्रातील तज्ञांनी अषाच प्रकारे प्रदुशण होत राहील्यास पृथ्वीवरील जीवनाचा कालावधी हा २०० ते ३०० वषपिक्षा जास्त राहणार नाही असे भाकीत वर्तवीले आहे. स्टीफन हॉकीन्स या शास्त्रज्ञानी मनुश्याला भविश्यात राहण्यासाठी दुसरा ग्रह षोधण्याचा सल्ला दिला. पर्यावरण रक्षणाबाबत राज्यकर्ते व सामान्य नागरीक दोघेही उदासीन असल्याचे दिसून येतात. पर्यावरण रक्षणाबाबत तत्काळ ठोस अषी उपाययोजना करणे अत्यावष्यक आहे. याकरीता मानवाने जगा—जगु द्या—जगवा आणि जागवा या मुल्यांचा अंगीकार करणे अगत्याचे आहे.

**संदर्भ :**

१) पर्यावरणशास्त्र : प्रा. डॉ. वर्षा गंगणे
२) www.gogle.com

❑❑❑